कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर चित्रपट, दूरचित्रवाणी मालिका / OTT यांच्या चित्रिकरण कामासंदर्भात मार्गदर्शक तत्वे.

महाराष्ट्र शासन
पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग
शासन निर्णय क्रमांक : कोचिन-२०२० / प्र.क्र.३७ /सां.का.१
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय ( विस्तार ), मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ३० मे, २०२०

वाचा : १) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, क्र.डीएमयू-२०२०/प्र.क्र.९२/डीएमयू-१, दि.०२.०५.२०२०, दि.०३.०५.२०२०, दि.०५.०५.२०२०, दि.११.०५.२०२०, दि.१७.०५.२०२० व दि.१९.०५.२०२०

२) केंद्र शासन, गृह मंत्रालय, आदेश क्र.४०-३/२०२०-डीएम-आय (ए), दि.०१.०५.२०२०, दि.११.०५.२०२० व दि.१७.०५.२०२०

**प्रस्तावना :**

कोविड-१९ विषाणूंच्या प्रादुर्भावास प्रतिबंध करण्यासाठी शासनाने उपर्निर्दिष्ट शासन आदेशान्वये विविध बाबींवर / कामांवर निर्बंध आणले आहेत. तसेच पुनर्विचारांती काही निर्बंध आवश्यकतेनुसार शिथिल केलेले आहेत. कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर बंद पडलेली चित्रपट, दूरचित्रवाणी मालिका / OTT यांची चित्रिकरण कामे सुरु करण्यास परवानगी देण्यासंदर्भात या क्षेत्रातील विविध संघटनांकडून / संस्थांकडून शासनास विनंत्या प्राप्त झालेल्या आहेत. कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे देशाच्या आर्थिक प्रगतीस खीळ बसल्याने काही प्रमाणात निर्बंध शिथिल करुन उद्योगधंद्यास चालना देण्यासाठी शासनाने उपर्निर्दिष्ट क्र.१ येथील दि.१९.०५.२०२० च्या आदेशान्वये परवानगी दिली आहे. त्या धर्तीवर चित्रपट, दूरचित्रवाणी मालिका / OTT यांची चित्रिकरण कामेही नियंत्रित पध्दतीने सुरु करण्यास परवानगी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. या संदर्भात शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय :-**

कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर चित्रपट, दूरचित्रवाणी मालिका / OTT यांच्या चित्रिकरण कामांसंदर्भात, या शासन निर्णयासोबत जोडण्यात आलेल्या परिशिष्ट-अ (Annexure-A) मधील मार्गदर्शक तत्वांच्या अधिन राहून ही कामे नियंत्रित स्वरुपात सुरु करण्यास शासन मान्यता देत आहे. प्री-प्रॉडक्शन व पोस्ट-प्रॉडक्शन विषयक कामांच्या परवानगीची प्रकरणेही या मार्गदर्शक तत्वानुसार हाताळता येतील. ही परवानगी देण्यामागील शासनाचा उदात्त हेतू विचारात घेऊन सर्व संबंधितांनी त्यांची कामे कोविड-१९ संदर्भातील कोणत्याही निर्बंधांचा भंग होणार नाही अशा पध्दतीने करणे आवश्यक आहे. या मार्गदर्शक तत्वांचा भंग झाल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित कामे आहे त्या स्थितीत बंद करुन या मान्यतेचा शासन पुनर्विचार करेल.

Scanned with CamScanner

०२. चित्रपट, दूरचित्रवाणी मालिका / OTT यांच्या चित्रिकरणाच्या कामांसंदर्भातील परवानगी मिळविण्यासाठी बृहन्मुंबई क्षेत्रात व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ, दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगाव, मुंबई व उर्वरीत जिल्हयातील चित्रिकरणासाठी संबंधित जिल्हाधिकारी यांचेकडे अर्ज सादर करण्यात यावेत.

०३. कोविड-१९ विषाणूंचा प्रादुर्भावास प्रतिबंध करण्यासाठी शासनाने घोषित केलेल्या टाळेबंदीच्या अनुषंगाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशातील बंधनकारक असणाऱ्या सूचना या प्रकरणीही लागू राहतील.

०४. सदर शासन निर्णय महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन यांनी त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र.डीएमयु-२०२०/प्र.क्र.९२/आव्याप्र-१, दि.३०.०५.२०२० अन्वये दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( डॉ.संजय मुखर्जी )
सचिव, महाराष्ट्र शासन

सहपत्र - परिशिष्ट-अ

प्रत,

१) मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३) मा. मंत्री, सांस्कृतिक कार्य यांचे खाजगी सचिव
४) मा. राज्यमंत्री, सांस्कृतिक कार्य यांचे खाजगी सचिव
५) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य
६) अपर मुख्य सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
७) अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
८) अपर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई
९) आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई
१०) सचिव, मदत व पुनर्वसन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
११) सचिव, सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई
१२) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ, दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगाव, मुंबई
१३) व्यवस्थापकीय संचालक, कोल्हापूर चित्रनगरी, कोल्हापूर
१४) जिल्हाधिकारी - (सर्व)
१५) पोलिस अधिक्षक - (सर्व)
१६) महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ, दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगाव, मुंबई द्वारा - सर्व संबंधित.
१७) निवड नस्ती - सां.का.१

Scanned with CamScanner